**वादीतर्फे साक्षीदार क्र. १/अ यांचा पुढील सरतपास वादीचे वकिल श्री. लियाकत अली यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

९. मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

**सरतपास संपला.**
**उलटतपास प्रतिवादी क्र. १ चे वकिल श्री.के.आर.देशपांडे यांचे मार्फत —**

१०. माझी जन्मतारीख ही दिनांक ३१.०७.२००५ अशी आहे. मी त्याबाबत माझा जन्माचा दाखला आणलेला नाही. माझा जन्म कुठे झाला हे मला सांगता येणार नाही. मी रमेश भरक्षे यांचेसोबत कधीपासुन राहते हे मला सांगता येणार नाही. माइया पुराव्याच्या शपथपत्रात माइया जन्माबाबत जी माहिती लिहीली आहे ती माहिती मला माइया वकील साहेबांनी दिली आहे.

११. हा दावा कशाबाबत आहे हे मला माहिती आहे. हा दावा शेतीसाठी आहे. ते शेत मुंडगाव येथील आहे. त्याचा गट क्रमांक ११/२अ असा आहे. त्याचे क्षेत्र मला सांगता येणार नाही. ते शेत कुणाच्या ताब्यात आहे व ते कधीपासुन त्यांच्या ताब्यात आहे हे मला सांगता येणार नाही. नथु भरक्षे, धृपदाबाई भरक्षे व रमेश भरक्षे यांचेसोबत माझे काय नाते आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी न्यायालयामार्फत अ.पा.क. म्हणुन माझे तर्फे रमेश इंद्रभान भरक्षे यांची नियुक्ती करण्यात आली त्यावेळी धृपदाबाई भरक्षे ही हयात होती. धृपदाबाई भरक्षे ही कधी मरण पावली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी केवळ रमेश भरक्षे यांच्या सांगण्यावरून या प्रकरणातील माइया पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**प्रतिवादी क्र. १ तर्फे उलटतपास संपला.**

१२. **प्रतिवादी क्र. २ बाबत हा दावा अबेट झालेला आहे, सबब प्रतिवादी क्र. २ तर्फे उलटतपास नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र. ३ व ४ तर्फे वकील श्री. ए.आर.कट्टा यांचे मार्फत :**

१३. मी विश्वंभर सोनोने व नर्मदा सोनोने यांची वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र न्यायालयाकडुन मिळविले आहे व ते वारस प्रमाणपत्र या प्रकरणात अभिलेखावर दाखल केले आहे. मी सदरचे वारसप्रमाणपत्र मिळविण्यासाठी न्यायालयात कोणत्या साली अर्ज दाखल केला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी कोणतेही न्यायालयाकडुन तसे वारसप्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही म्हणुन मी ते या प्रकरणात अभिलेखावर दाखल केलेले नाही. विश्वंभर सोनोने हे कोणत्या तारखेला मरण पावले हे मला सांगता येणार नाही. मी सज्ञान झाल्यानंतर जन्ममृत्युची नोंद असलेल्या कार्यालयात जावुन तेथील अभिलेख पाहिलेला नाही. हे मला माहित नाही की नर्मदा सोनोने ही दिनांक २०.०७.२००६ रोजी मरण पावली व विश्वंभर सोनोने हे दिनांक २४.०५.२००३ रोजी मरण पावली.

१४. माझे पालनपोषण रमेश इंद्रभान भरक्षे यांनी केले आहे. मी नर्मदा सोनोने हिचेसोबत कधी राहील्याचे मला माहिती नाही. मी माझ्या जन्मानंतर नर्मदा सोनोने हिचेसोबत राहीले हे दाखविणारे कागदपत्र व फोटोग्राफस माझ्याकडे आहेत. ते मी या प्रकरणाच्या पुढील तारखेला न्यायालयात दाखल करू शकते. माझा जन्म हा रूग्णालयात झाला होता कि इतर दुस—या ठिकाणी झाला होता याबाबत मला माहिती नाही. मी सज्ञान झाल्यानंतर माझ्या जन्माच्या नोंदीची चौकशी मी स्वत: हिवरखेड ग्रामपंचायत कार्यालय येथे जावुन केली आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर जन्माचे नोंदीचे रजिस्टरमध्ये बाळाचे नाव राही व वडीलांचे नाव विश्वंभर सोनोने असे ज्या ठिकाणी नमुद आहे त्या ठिकाणी वडीलांच्या नावाच्या ठिकाणचे रमेश इंद्रभान भरक्षे हे नाव खोडलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या रजिस्टरमध्ये आईचे नाव इंदु हे नाव खोडुन नर्मदा असे नाव नमुद करण्यात आले आहे. सदर रजिस्टरमध्ये तशी नावे बदलण्यात आली होती याबाबत रमेश भरक्षे यांनी मला कधीही सांगितलेले नाही.

१५. नर्मदा सोनोने हिचे आईवडील कोण होते त्यांची नावे काय होती याबाबत मी कधीही चौकशी केलेली नाही. विश्वंभर सोनोने हा कुठे राहत होता याबाबत सुध्दा मी कधीही चौकशी केलेली नाही. या दाव्याची वादमालमत्ते व्यतिरीक्त विश्वंभर सोनोने याचेकडे वडीलोपार्जीत अथवा स्वकष्टार्जीत अशी कुणतीही मालमत्ता होती किंवा नाही याची चौकशी मी कधीही केलेली नाही. हे म्हणणे खरे

नाही की विश्वंभर सोनोने याच्या स्वकष्टार्जीत किंवा वडीलोपार्जीत मिळकतींमध्ये माझे नाव लावण्याकरीता मी कधीही कुठेही अर्ज केला नाही. या दाव्यातील मालमत्ता सोडुन विश्वंभर याच्या नावाच्या इतर कोणत्या मालमत्तेला माझे नाव वारस म्हणुन लावण्यासाठी मी अर्ज केला हे मला माहित नाही.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की हा दावा दाखल करण्यात आला त्यावेळी मी अज्ञान होती. मी अज्ञान असतांना माझे पालक म्हणुन रमेश भरक्षे यांना दावा दाखल करावा यासाठी मी रमेश भरक्षे यांना व्यक्तीशः निर्देश दिलेले नाही. मी १७ वर्षे वयाची असतांना मला माझ्या वतीने हा दावा न्यायालयात दाखल करण्यात आल्याचे पहिल्यांदा समजले आहे. मी दाव्यात दावा मालमत्तेवर माझा जो काही तथाकथीत हक्क सांगितला आहे त्या हक्काबाबत मला माझा आते भाउ रमेश भरक्षे याने माहिती दिली आहे.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की मी विश्वंभर सोनोने व नर्मदा सोनोने यांची नैसर्गिक मुलगी नाही. हे म्हणणे खरे नाही की मी रमेश भरक्षे व इंदुबाई भरक्षे यांची मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की रमेश भरक्षे याने मी विश्वंभर व नर्मदा यांची मुलगी असल्याबाबतची खोटी नोंद घेवुन त्या नोंदी आधारे विश्वंभर सोनोने याची दावामिळकत मला वारसाहक्काने प्राप्त करून घेण्यासाठी हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी रमेश भरक्षे याचे सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. ०४.०४.२०२५.

( महेश एस. काळे )

**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**